(नोंदणी क्रमांक २९७७०) (Reg. No. 29770)

दि भाभा अणुसंशोधन केंद्र कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, मुंबई

आर-५ शेड, बीएआरसी, ट्रॉम्बे, मुंबई - ४०० ०८५.

The Bhabha Atomic Research Centre Employees' Co-op. Credit Society Ltd., Mumbai

R-5 Shed, BARC, Trombay, Mumbai - 400 085.

E-Mail: barc.society@gmail.com | Website: https://www.barcsociety.com



The Bhabha Atomic Research Centre
Employees' Co-op. Credit Society Ltd., Mumbai
(2022-2027)

Dr. M.S. Kulkarni
Ex-Officio President

Shri. B. V. Balaji
Ex-Officio Vice President

संचालक मंडळ
Board of Directors

अध्यक्ष



श्री. हेमंत कोळी
Shri. Hemant Koli

मानद सचिव



श्री. शिवाजी हगवणे
Shri. Shivaji Hagawane

उपाध्यक्ष



श्री. पी. बी. हांडे
Shri. P. B. Hande

खजिनदार



श्री. एस.पी.एस.रॉय
Shri. S. P. S. Roy

संचालक



श्री. राजेश चौधरी
Shri. Rajesh Chaudhari

संचालक



श्री. विवेक भागडिया
Shri. Vivek Bhagadia

संचालक



श्री. संतोष ढमढेरे
Shri. Santosh Dhamdhere

संचालक



श्री. सी. आय.मेदार
Shri. C.I. Medar

संचालक



श्री. बी. के. चौगुले
Shri. B. K. Chougule

संचालक



श्री. बी.पी. टेळे
Shri. B. P. Tele

संचालक



श्री. गजानन चकोले
Shri. Gajananan Chakole

संचालक



श्री. अनिल कुटे
Shri. Anil Kute

संचालिका



सौ. ऋतुजा आर. राणे
Mrs. Rutuja R. Rane

संचालिका



सौ. मनिषा डी. पाटील
Mrs. Manisha D. Patil

संचालक



डॉ. मिलिंद लंकेश्वर
Dr. Milind Lankeshwar

कार्यलक्षी संचालक



श्री.आर.के मोरे (व्यवस्थापक)
Mr. R. K. More (Manager)

दि भाभा अणुसंशोधन केंद्र कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, मुंबई

(नोंदणी क्रमांक : २९७७०)

आर - ५ शेड, बीएआरसी, ट्रॉम्बे, मुंबई-४०० ०८५.

अधिसुचना

दि भाभा अणुसंशोधन केंद्र कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या सर्व सभासदांना यासूचनेद्वारे कळविण्यात येते की, आपल्या पतसंस्थेच्या अधिमंडळाची 63वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.25 ऑगस्ट 2024 रोजी दुपारी 2.00 वाजता डी.ए.ई. कनव्हेंशन सेंटर, अणुशक्ती नगर येथे खालील कामकाजासाठी आयोजित केलेली आहे.

सभे पुढील विषय:

1 62 व्या वार्षिक सर्व साधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

2 1 एप्रिल 2023 ते 31 मार्च 2024 या कालावधीचा वार्षिक अहवाल, शासकीय लेखापरीक्षित ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्वीकारुन त्यास मान्यता देणे.

3 सन 2023-24 या आर्थिक वर्षाच्या नफा विभागणीस मान्यता देणे.

4 सन 2023-24 या आर्थिक वर्षाकरिता मंजूर केलेल्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी घेणे व सन 2024-2025 या आर्थिक वर्षाकरिता संचालक मंडळाने मांडलेल्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे.

5 शासकीय लेखापरीक्षक यांच्या सन 2023-2024 या आर्थिक वर्षाच्या हिशोब तपासणी अहवालाची नोंद घेणे.

6 सन 2024-2025 या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे.

7 सन 2022-2023 या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणातील दोषांचे वाचन करून त्या संबंधीच्या दोष दुरुस्ती अहवालाची (compliance report) नोंद घेणे.

8 संचालक मंडळाने सुचविलेल्या उपविधी दुरुस्तीस (परिशिष्ट "अ" प्रमाणे) मंजुरी देणे.

9 सभासदांना वर्गणी खात्यातील अंशतः रक्कम काढणेसाठी सुविधा देणेबाबत विचार करणे.

10 विक्रम कर्ज संरक्षण निधी योजनेच्या धोरणातील नियमात अंतर्भूत करावयाच्या बदलाबाबत निर्णय घेणे.

11 अधिमंडळाच्या 63व्या वार्षिक सर्व साधारणसभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.

12 माननीय अध्यक्ष यांच्या परवानगीने ऐन वेळी येणाऱ्या विषयांबाबत विचार करणे.

कृपया संस्थेच्या माननीय सभासदांनी सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

सही /-
शिवाजी आण्णासो हगवणे
मानद सचिव
संचालक मंडळाकरिता

दिनांकः 09.08.2024
मुंबई 400 085

टिपः

- सर्वसाधारण सभेच्या दिवशी दुपारी 2.00 वाजेपर्यंत आवश्यक गणसंख्या उपस्थिती आढळून आली नाही तर सभा तहकूब केली जाईल व अशी तहकूब झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी दुपारी 2.15 वाजता गणपूर्तीशिवाय घेतली जाईल आणि त्यात घेतलेले निर्णय सर्व सभासदांना बंधनकारक राहतील.
- 62व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तांताच्या प्रति दि.05.08.2024 पासून संस्थेच्या वेबसाईटवर (https://www.barcsociety.com) व संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध होतील आणि 63व्या वार्षिक अहवाल याच्या प्रती दि. 10.08.2024 पासून उपलब्ध होतील.
- सभेच्या विषय पत्रिकेतील अनुषंगाने सभासदांना काही माहिती, सुचना किंवा प्रश्न सभेपुढे मांडावयाचे असतील तर ते त्यांनी लेखी स्वरुपात दि.20.08.2024 पर्यंत सोसायटीच्या कार्यालयात दिले पाहिजेत. अशा विषयपत्रिकेतील विषयाच्या अनुषंगाने ज्या सभासदानी लेखी स्वरूपात सुचना/ प्रश्न दिले आहेत त्यास सभेच्या विषय पत्रिकेतील विषयाचे वेळी सभेमध्ये प्राधान्य देण्यात येईल.
- ज्या सभासदांनी मागील तीन वर्षांचा लाभांश घेतला नसेल तर तो त्यांनी सोसायटीच्या कार्यालयीन वेळेत येऊन दि. 31 मार्च, 2025 पूर्वी घ्यावा अन्यथा असा लाभांश वैधानिक गंगाजळी निधी खात्यात वर्ग करण्यात येईल.
- 63 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी देण्यात येणाऱ्या कुपन्स वितरणाबाबत स्वतंत्र परिपत्रकाद्वारे कळविण्यात येईल.

THE BARC EMPLOYEES' CO-OPERATIVE CREDIT SOCIETY LIMITED, MUMBAI
(Reg. No. 29770)
R-5 Shed, BARC Trombay, Mumbai - 400 085.

NOTIFICATION

Notice is hereby given that **63rd Annual General Body Meeting** of The Bhabha Atomic Research Centre Employees' Co-operative Credit Society Ltd., Mumbai – 400 085 will be held **at DAE Convention Centre, Anushakti Nagar on 25th August 2024, Sunday at 2.00 p.m.** to transact the following business:

AGENDA

1. To read & confirm the minutes of 62nd Annual General Body Meeting.
2. To approve the annual report and Statutory Audited Statement of Accounts for period 1st April 2023 to 31st March 2024.
3. To approve the appropriation of profit for the F.Y. 2023-2024.
4. To give sanction for expenditure incurred in excess of the approved budget for the financial year 2023-24 and to approve the budget for the F.Y. 2024-2025 as recommended by the Board of Directors.
5. To read the Statutory Audit Report for the F.Y. 2023-2024.
6. To approve the appointment of Statutory Auditor for F.Y. 2024-2025.
7. To read the compliance report in respect of the Audit Report for financial year 2022-2023.
8. To approve the proposed amendment (as per Annexure"A") recommended by the Board of Directors.
9. To consider providing partial withdrawal facility to the members from their subscription account.
10. To decide about changes to be incorporated in the policy rules of Vikram Karja Saurakshan Yojana (VKSY).
11. To condone absence of the members, who are not present in 63rd Annual General Body Meeting.
12. To consider any other matter brought forward with the permission of the Chair.

All the members are requested to attend the meeting.

Sd/-
Shivaji Annaso Hagawane
Hon. Secretary
on behalf of Managing Committee

Date: 09.08.2024
Mumbai-400 085

Note:

- If it is found that there is no quorum for the meeting up to 2.00 p.m. the meeting shall be adjourned and this adjourned meeting shall be held on the same day at 2.15 p.m. in the same premises and the business on the agenda shall be transacted in the adjourned meeting irrespective of quorum.
- Copies of the Minutes of 62nd Annual General Meeting are available in Society Office and on website of Society https://www.barcsociety.com from 05.08.2024 and 63rd Annual Report are available from 10.08.2024.
- If the members want to raise any information, suggestions or questions before the AGM in connection with subject given in Agenda of meeting, they should submit it in written in Society office on or before 20.08.2024. Those members who have submitted suggestions/questions in written form related with Agenda points will be given preference in the meeting at the time of that Agenda point.
- Members who have not yet collect their Dividend for the last three years, requested to collect the same on or before 31st March 2025. Otherwise, Dividend amount will be transferred to Statutory Reserve Fund Account.
- Regarding Coupon Distribution for the 63rd Annual General Meeting will be intimated through a separate circular.

६२ व्या वार्षिक सर्वसाधारणसभेमधील
संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष डॉ. मुकुंद कुलकर्णी यांचे अध्यक्षीय भाषण

बीएआरसी एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या ६२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या आस्थापनेचे उपस्थित असलेले अधिकारी श्री बालाजी साहेब, संस्थेचे अध्यक्ष श्री हेमंत कोळी, उपाध्यक्ष श्री पांडुरंग हांडे, मानद सचिव श्री शिवाजी हगवणे, खजिनदार श्री शिबू प्रशाद सिंघा रॉय, संचालक मंडळातील सदस्य तसेच सभेस उपस्थित असलेले आपण सर्व आदरणीय सभासद यांचे मी वार्षिक सर्वसाधारण सभेत हार्दिक स्वागत करतो. सर्वाना माहीत आहे की सोसायटीची लांबणीवर गेलेली निवडणूक प्रक्रिया दि. ११.१०.२०२२ रोजी सुरु झाली. दि. १६. ११.२०२२ रोजी निवडणूक झाली, दि. २०. ११. २०२२ रोजी मतदान मोजणी प्रक्रिया पार पडली आणि दि. २५. ११.२०२२ रोजी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निर्णय जाहीर केला आणि तत्कालीन संचालक मंडळाकडून दि. ३०.११. २०२२ रोजी या नूतन संचालक मंडळाने पदभार स्वीकारला. या सर्वांना मी धन्यवाद देतो आणि संस्थेच्या सभासदांनी जो संचालक मंडळावर विश्वास दर्शविला आहे त्या आणि संस्थेच्या हितास कोणत्याही प्रकारे धक्का बसणार नाही याची दक्षता घेऊन कामकाज व्हावे असे मी सर्वांच्या वतीने या संचालक मंडळास सूचित करीत आहे.

संस्थेचा पदभार स्वीकारल्यांनंतर नवनियुक्त संचालक मंडळाने अतिशय चांगल्या प्रकारे निर्णय घेऊन कामकाजास सुरुवात केली ते निर्णय पुढीलप्रमाणे :-

१. संचालक मंडळाने मानधन न घेणे.
२. महिला व दिव्यांग सभासदांकरिता विशेष काउंटर सेवा उपलब्ध करून देणे.
३. कामकाजाची वेळ सलग सकाळी नऊ ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत करणे.
४. बचत ठेवीवरील व्याजदर ३. ५ % वरून ४. ५% करणे.
५. विशेष कर्जावरील सरसकट व्याजदर १०.३५ % इतका करणे.
६. मयत सभासदाचे विशेष कर्ज व साधारण कर्ज ' विक्रम कर्ज संरक्षण निधी' योजनेतून माफ करण्याचा निर्णय घेणे.
७. सेवानिवृतीच्या वेळी सभासदत्वाच्या प्रतिवर्ष रु. ५००/- प्रमाणे सन्मान राशी देऊन सन्मानित करणे.
८. अहवाल वर्षात गंगाजळीची रक्कम नफा विभागणीतून २५% काढण्या ऐवजी १०% काढण्याची परवानगी मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकडून आणली.
९. सभासदांना त्यांच्या ठेवीचा परतावा जलद गतीने त्यांच्या बँक खात्यात स्टेट बँक ऑफ इंडियाच्या CMP पोर्टल द्वारे अदा करणे.

इत्यादी कामे पूर्णत्वास घेऊन गेले आहेत. त्याचप्रमाणे आपणांसमोर सहकार विभागाने घालून दिलेले कर्जधोरण स्वीकारण्यासाठी मांडले यामुळे आपला सर्वांचा आर्थिक विकास होणार आहे. संचालक मंडळाने सुचविलेल्या या उपविधी दुरुस्तीस आपण सर्वांनी मंजुरी द्यावी अशी अपेक्षा मी व्यक्त करीत आहे.

तत्कालीन संचालक मंडळाने मांडलेल्या अंदाजित नफा - तोटा पत्रकाच्या अंदाजानुसार काम केले यामध्ये प्रामुख्याने उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ पाहिल्यास केवळ रुपये १.३ कोटीने अंदाज कमी झाला तरीसुद्धा विद्यमान

संचालक मंडळाने अहवाल वर्षात १५% लाभांश वाटण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यमान संचालक मंडळाने आपणासमोर याबद्दल नफा विभागणी मांडली आहे त्यास मान्यता देण्याची शिफारस मी करीत आहे.

अहवाल वर्षात सभासदांकडून ठेवी स्वीकारण्यात आल्या त्या रुपये ५२० कोटी इतक्या झाल्या आहेत ज्या गतवर्षी ५३७ कोटी होत्या या ठेवी ३.२७% ने घटल्या आहेत.

सभासदांना जे कर्ज वाटप करण्यात आले आहे ते अहवाल वर्षात रुपये ७२५.२८कोटी इतके आहे जे गतवर्षी ६६३.२० कोटी इतके वाटप केले होते. त्यामुळे अहवाल वर्षात कर्ज वाटपामध्ये ९. ३६% ने वाढ झाली आहे.

संस्थेचे एकूण खेळते भाग भांडवल अहवाल वर्षात रुपये ८१०.४३ कोटी इतके झाले आहे ते गतवर्षी रुपये ७३५.२० कोटी इतके होते. अहवाल वर्षात यामध्ये १०.२५ % वाढ झाली आहे.

तसेच आपणा सर्वांच्या सहकार्याने खेळते भाग भांडवल रुपये १,००० कोटी पार पाडण्याचा संचालक मंडळाचा मानस आहे.

अहवाल वर्षात सभासदांना तत्कालीन संचालक मंडळाने, विद्यमान संचालक मंडळाने आणि संस्थेच्या कर्मचारी वर्गाने उत्तम प्रकारे सेवा दिल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देत आहे.

आता मी संस्थेचे अध्यक्ष श्री हेमंत कोळी यांना आजच्या सभेचे कामकाज सुरू करण्यासाठी विनंती करीत आहे.

अध्यक्षीय मनोगत

सन्माननीय भागधारक सभासद बंधू-भगिनींनो,
सप्रेम नमस्कार !

मी संस्थेचे उपाध्यक्ष ,मानद सचिव, खजिनदार व उपस्थित संचालक यांचे 63 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत स्वागत स्वागत करतो.

सर्वप्रथम मी या आर्थिक वर्षात दिवंगत झालेले संस्थेचे सभासद, शास्त्रज्ञ, डॉक्टर, नर्सेस, साहित्यिक, सुरक्षा व पोलीस दलातील जवान यांना संस्थेच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करीत आहे.

आपल्या संस्थेच्या सन 2023-24 या अहवाल वर्षाचा लेखाजोखा, आपण लोकशाहीच्या मार्गाने निवडून दिलेल्या संचालक मंडळाच्या वतीने, सन्माननीय भागधारक सभासदांच्या समोर मांडताना आम्हास अतिशय आनंद होत आहे.

आपल्या संस्थेने विविध स्तरावर नेत्रदीपक प्रगती केलेली आहे. आपल्या सर्वांच्यासाक्षीने पतसंस्थेच्या गतवर्षीच्या अहवाला पेक्षा रुपये 115 कोटीने अधिक वार्षिक उलाढाल केली आहे. आमचे संचालक मंडळ संस्थेची आर्थिक परिस्थिती सुस्थितीत ठेवण्यात यशस्वी झाले आहे. आपली ही संस्था पर्यायाने कर्जदार व ठेवीदार सभासदावरच अवलंबून आहे. पूर्वी विशेष कर्ज मंजूर रकमेपैकी केवळ बारा लाख विशेष कर्ज हे विशेष कर्ज संरक्षण योजने अंतर्गत निरस्त करण्यात येत होते परंतु आमच्या संचालक मंडळाने मयत कर्जदार वारसांची व जामीनदार सभासदांची आर्थिक अडचण लक्षात घेऊन साधारण कर्ज व विशेष कर्जाची संपूर्ण रक्कम विक्रम कर्ज संरक्षण योजनेच्या अखत्यारीत आणली. यास अनुसरून दिनांक 25 जानेवारी 2024 पासून अंमलात आलेले दीर्घकालीन कर्ज धोरण ही या योजनेच्या अंतर्गत आणले आहे. यामुळे कर्जदार सभासदाचे कुटुंब व जामीनदार यांना दिलासा मिळणार आहे. साधारण कर्ज, विशेष कर्ज व दीर्घमुदत कर्ज हे विक्रम कर्ज संरक्षण योजनेच्या अंतर्गत आणले आहे जे पूर्वी विशेष कर्ज -कर्ज संरक्षण योजना म्हणून गणले जात होते.
उच्च कार्याला गती देण्यासाठी संस्थेच्या कार्यपद्धतीत बदल करून त्यामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी आम्ही सक्षम झालो आहोत सभासदांनी संस्थेप्रती दिलेल्या योगदानातून त्यांचा सर्वांगीण आर्थिक विकास करण्यासाठी विद्यमान संचालक मंडळ व कर्मचारी वर्गाने भाग घेतल्यामुळेच आमच्या संस्थेच्या सभासदांचे सामर्थ्य वाढले आहे.

विद्यमान संचालक मंडळाने सन 2023- 24 मध्ये केलेल्या नेत्रदीपक कामगिरीचे ठळक मुद्दे:

1. संस्थेच्या सिस्टीममध्ये पगारातून येणाऱ्या हप्त्यामध्ये असलेल्या अडचणी दूर करून स्थिरता आणली.
2. आस्थापनेच्या सहकार्यामुळे प्रगतीपथावर असलेल्या आपल्या पतसंस्थेच्या माध्यमातून सभासद कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीच्या वेळी आवश्यक असलेले ड्युज, नो ड्यूज सर्टिफिकेट हे ई-मेलच्या माध्यमातून आस्थापनास पाठवून देणे.
3. सभासदांना त्यांची देय असलेली रक्कम स्टेट बँकेच्या सीएमपी पोर्टल द्वारे त्वरित पाठवून देण्याची व्यवस्था करण्यात आली.
4. टीडीएसच्या संकल्पनेच्या माध्यमातून ज्या सभासदांची टीडीएसची रक्कम संस्थेने त्यांच्या वतीने भरलेली आहे ती त्यांनी संस्थेस परत करण्यासाठी त्यांच्यावर आर्थिक बोजा येऊ नये म्हणून दिनांक 31 मार्च रोजीच त्यांच्या देय असलेल्या सभासद वर्गणीच्या व्याजातून वजा करून घेतली.
5. तिमाही पद्धतीने टीडीएस : सभासदांच्या ठेवीवर आयकर विभागाच्या कायदा व नियमानुसार सभासदांना मिळणारे व्याज हे वार्षिक उत्पन्न न समजता तिमाही पद्धतीने विचारात घेऊन टीडीएसची रक्कम भरणा करण्यात येत आहे.

6. दीर्घकालीन कर्ज : सभासदांचा सर्वांगीण आर्थिक विकास करण्यासाठी सहकार विभागाच्या नवीन कर्ज धोरणाचा अवलंब करण्यात आला. आस्थापनेच्या आवारात राहणाऱ्या सभासदांचा त्यांची कर्ज परतफेडीची क्षमता लक्षात घेऊन घरभाडे भत्त्याची रक्कम एकूण वेतनात समाविष्ट करण्यात आली त्यामुळे अशा सभासदांना जास्तीत जास्त कर्जाचा लाभ मिळाला.
7. ठेवींचे पुनर्गुंतवणूक : आस्थापनेच्या कामात व्यस्त राहिल्याने ठेवीदार सभासद आपल्या ठेवींचे पुनर्गुंतवणूक करण्यास विसरून जात होते. सभासदांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी दिनांक 01/04/2024 पासून ठेवींचे स्वयं नूतनीकरण करण्यास सुरुवात झाली आहे.
8. दीर्घकालीन कर्जावरील व्याज आकारणी दैनंदिन पद्धतीने केल्यामुळे सभासदांची आर्थिक बचत झाली.
9. आवर्त ठेवींच्या प्रकारातील ठेवींचे दिनांक 01/04/2024 नंतर परिपक्वता पूर्ण झाल्यानंतर ज्या ठेवदार सभासदांनी ठेवी स्वीकारल्या नाहीत अशा सभासदांना त्यांच्या देय तारखेपासून बचत ठेवी चे व्याज देण्यास सुरुवात केली आहे.
10. एसएमएस अलर्ट मेसेज : सभासदाने संस्थेशी केलेल्या आर्थिक व्यवहाराची नोंद एसएमएस द्वारे देण्यास सुरुवात केली आहे.
11. वेबसाईट अपडेशन : वेबसाईटच्या माध्यमातून संस्थेचे सभासद त्यांची व्यक्तिगत माहिती प्राप्त करून घेत आहेत.

वेध भविष्याचा

आम्ही सभासदांचे हित जोपासण्यासाठी आत्तापर्यंत राहून गेलेल्या कामकाजाची पूर्तता लवकरच करणार असून ती पुढील प्रमाणे -

1. टीडीएस मुळे होणाऱ्या त्रासाचे निराकरण करण्यासाठी सभासद वर्गणीची आंशिक रक्कम काढण्यासाठी सहकार विभागाची परवानगी मिळवून आणणे.

सन 2020-21 या आर्थिक वर्षापासून सभासदांना मिळालेल्या व्याज रकमेवर आयकर विभागाने कायदा व नियम 194 A नुसार आकारलेल्या टीडीएस मुळे सभासदांना त्रास होत आहे यासाठी आम्ही दिलगिरी व्यक्त करीत आहोत. मनुष्य प्राण्याला बुद्धिमत्ता, विचारशक्ती व भावना या मिळालेल्या देणग्या आहेत. माणसाचे खरेपण हे तुम्ही काय करता यावर अवलंबून आहे. सामाजिक बंधिलकीसाठी आपल्या देशास मोठी परंपरा लाभलेली आहे. संस्थेचे कामकाज अधिक गतिमान व अधिक कार्यक्षमतेने व्हावे याकरिता स्पर्धात्मक युगाचे आव्हान पेलत सभासदांना चांगली सेवा देण्याकरिता आम्ही कटिबद्ध आहोत. आपली संस्थेचे घटक जसे की संस्थेचे गुंतवणूकदार सभासद, कर्जदार सभासद, हितचिंतक यांच्याशी हितसंबंध दृढ होण्यासाठी संस्थेच्या कर्मचाऱ्यांना आम्ही अधिकाधिक चालना देणार आहोत.

सहकार चळवळ सुदृढ व बळकट करण्यासाठी योगदान देऊन ती तुमच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. संस्थेच्या प्रगतीसाठी अहोरात्र झटणारे संचालक मंडळ, कर्मचारी, सभासद, ठेवीदार, हितचिंतक

यांनी दिलेल्या सहकार्यामुळे व प्रोत्साहनामुळे संस्थेने अप्रतिम यशस्वी वाटचाल केली आहे या सर्वांचे आम्ही आभारी आहोत .

आपल्या सर्वांना उदंड आयष्य, आरोग्य, सौख्य व समृद्धी लाभो ही मनोभावे प्रार्थना करून मी माझे मनोगत पूर्ण करतो .

जय हिंद! जय महाराष्ट्र ! जय सहकार !

आपला नम्र,
हेमंत श्रावण कोळी
अध्यक्ष
संचालक मंडळाच्या वतीने

दिनांक : 25 ऑगस्ट, 2024.

Speech by Dr. Mukund Kulkarni, Ex-Officio President, at the 62nd Annual General Meeting of the BARC Employees Co-operative Society

Respected officials present at the establishment of the 62nd Annual General Meeting of the BARC Employees Co-operative Credit Society, Mr. Balaji Saheb, Chairman Mr. Hemant Koli, Vice-Chairman Mr. Pandurang Hande, Honorary Secretary Mr. Shivaji Hagwane, Treasurer Mr. Shibu Prasad Singha Roy, members of the Board of Directors, and all esteemed members present, I warmly welcome you all to the Annual General Meeting. It is well known to everyone that the Society's long-postponed election process began on 11.10.2022. The election took place on 16.11.2022, vote counting was conducted on 20.11.2022, and the Election Returning Officer declared the results on 25.11.2022. The newly elected Board of Directors took charge from the then Board on 30.11.2022. I thank everyone for this and assure that the trust shown by the members in the Board of Directors will not be compromised in any way, and all work will be carried out with utmost diligence.

After taking charge, the newly elected Board of Directors made commendable decisions, which are as follows:

1. The Board of Directors decided not to take any honorarium.
2. Special counter services for women and disabled members.
3. Continuous working hours from 9 AM to 5 PM.
4. Increase in interest rate on savings deposits from 3.5% to 4.5%.
5. Uniform interest rate of 10.35% on special loans.
6. Decision to waive special loans and general loans of deceased members under the 'Vikram Karj Saurakshan Yojana' scheme.
7. Honorarium of Rs. 500 per year of membership upon retirement.
8. Instead of withdrawing 25% of the profit for the Reserves Fund from Appropriation of profit, permission to withdraw only 10% was obtained from the Commissioner and Registrar of Co-operative Societies, Maharashtra State, Pune.
9. Refund of members' deposits to be quickly credited to their bank accounts through the State Bank of India's CMP portal.

Having completed these tasks, we now present the cooperative department's recommended loan policy for your acceptance. This will ensure the financial growth of all members. I hope you will all approve these bylaw amendments suggested by the Board of Directors.

Despite an estimated reduction of Rs. 1.3 crores in the projected profit and loss statement presented by the previous Board of Directors, the current Board has decided to declare a 15% dividend for the report year. I recommend approving the profit distribution presented by the current Board.

During the report year, deposits accepted from members amounted to Rs. 520 crores, compared to Rs. 537 crores in the previous year, a decrease of 3.27%. Loans

The Society's total working capital during the report year was Rs. 810.43 crores, compared to Rs. 735.20 crores in the previous year, showing an increase of 10.25%.

With everyone's cooperation, the Board of Directors aims to surpass Rs. 1,000 crores in working capital. I thank the members, the previous Board of Directors, the current Board of Directors, and the staff for providing excellent services during the report year.

Now, I request the Chairman, Mr. Hemant Koli, to commence today's meeting proceedings.

Chairman Speech

Honourable Shareholders and Members,

Greetings!

I welcome to the Vice Chairman, Honorary Secretary, Treasurer, and the attending Board of Directors of the society present on the dais at the 63rd Annual General Meeting.

Firstly, on behalf of the society, I offer my heartfelt condolences to the members, scientists, doctors, nurses, litterateurs, and personnel from the security and police forces who have passed away this financial year.

We are very pleased to present the financial statements of the fiscal year 2023-24 on behalf of the democratically elected Board of Directors to the honourable shareholder members.

Our society has made remarkable progress on various fronts. With your support, we have achieved an annual turnover that exceeds the previous year's report by Rs. 115 crores. Our Board of Directors has been successful in maintaining the society's financial stability. Our society relies heavily on the borrowing and deposit-holding members. Previously, only twelve lakh special loans from the approved loan amount were annulled under the Karj Saurkshan Yojana. However, our Board of Directors, considering the financial difficulties of the heirs of deceased borrowers and sureties members, has brought the entire amount of ordinary and special loans under the Vikram Karj Saurkshan Yojana. Accordingly, the long-term loan policy implemented from January 25, 2024, has also been included under this scheme. This will provide relief to the borrowing members' families and sureties. Ordinary loans, special loans, and long-term loans are now included under the Vikram Karj Saurkshan Yojana, which was previously considered as the “Special loan – Karj Saurksha Yojana”.

We have become proficient in making changes to the society's operational procedures to bring in more efficiency. The existing Board of Directors and staff have taken steps to ensure the holistic economic development of the members through their contributions to the society. This has strengthened our members.

Key achievements by the existing Board of Directors in the year 2023-24:

1. Stabilized the issues in the system related to deductions from salaries.
2. Arranged for the issuance of necessary dues and No Due Certificates to the establishment via email through our society, facilitating employees' retirement processes.
3. Ensured prompt disbursement of due amounts to members through the CMP portal of the State Bank of India.
4. Members whose TDS amount has been paid by the Society to the Income Tax Department on their behalf through TDS Concept, have been deducted from their membership subscription interest on 31st March, so that they do not incur financial burden to return it to the Society.
5. TDS is now calculated on a quarterly basis: Interest received by members on their deposits is considered quarterly instead of annually, as per the Income Tax Department's laws and regulations.
6. Implemented the new loan policy of the cooperative department for the overall economic development of members. Members residing within the establishment's premises/colony now have their house rent allowance included in their total salary, providing them with higher loan benefits.
7. Started reinvestment of deposits from April 1, 2024, to prevent loss to members who might forget to reinvest due to their busy schedules.

8. Daily interest calculations on long-term loans have resulted in financial savings for the members.

9. Initiated savings deposit interest for members whose recurring deposits matured after April 1, 2024, and were not claimed.

10. Started SMS alert messages for transactions made with the society.

11. Updated the website to allow members to access their personal information.

Future Plans

To safeguard the interests of our members, we will soon complete the pending tasks:

1. Obtain approval from the cooperative department to withdraw partial amounts from member subscription to address issues arising from TDS.

We apologize for any inconvenience caused by the TDS levied on interest amounts received by members since the financial year 2020-21 as per Section 194A of the Income Tax Act.

Humans are endowed with intelligence, thinking power, and emotions. A person's true nature is determined by their actions. Our country has a rich tradition of social commitment. We are committed to providing excellent service to our members in this competitive era to make the society's operations more efficient. We will encourage our employees to strengthen the bond with our stakeholders, including members, investors, well-wishers, and borrowers.

We are committed to contributing to and promoting the cooperative movement. We are grateful to the Board of Directors, Employees, members, depositors, and well-wishers who have supported and encouraged the society's successful journey.

With heartfelt prayers for your long life, health, happiness, and prosperity, I conclude my address.

Jai Hind! Jai Maharashtra! Jai Sahakar!

Hemant Shravan Koli
Chairman
On behalf of the Board of Directors

Date: August 25, 2024

सन्माननीय सभासद ,

३१ मार्च २०२४ अखेरचा वार्षिक अहवाल, अंतर्गत आणि वैधानिक लेखापरीक्षित ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रक व पुढील वर्षासाठीचे अंदाज पत्रक आपल्या मान्यतेसाठी सादर करताना आंम्हाला आनंद होत आहे. या अहवाल वर्षात संस्थेस एकूण रुपये १३,१३,२५,८३९/- इतका नफा झाला असून त्यातील रु. ८,१४,४९,३१५/- इतकी रक्कम तरतूद करून निधीत वर्ग करण्यात आली आहे. त्या नंतर या वर्षात निव्वळ नफा रु. ४,९८,७६,५२४/- इतका झाला आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे या आर्थिक वर्षात संस्थेने केलेल्या कार्याचा तपशील आम्ही आपल्यापुढे सादर करीत आहोत.

१. नफा विभाजन : अहवाल वर्षात एकूण रोख रु. ४,९८,७६,५२४/- इतका निव्वळ नफा असून त्यात मागील शिल्लक रु.२२,०९,८४९/- मिळवून अहवाल साली पतसंस्थेस नफा विभागणीस एकूण रु. ५,२०,८६,३७३/- इतकी रक्कम उपलब्ध झाली. त्याची विभागणी पुढीलप्रमाणे करण्यासाठी संचालक मंडळ शिफारस करीत आहे. त्यास आपण मान्यता द्यावी.

नफा रु. ४,९८,७६,५२४/- वर १०% गंगाजळी	रु.	४९,८७,६५२.००
भाग रकमेवर १५% लाभांश	रु.	४,२५,९४,२५८.००
बोनस - सभासद भविष्य सहाय्य निधी	रु.	१४,८५,५०१.००
सहकारी प्रशिक्षण	रु.	५,००,०००.००
शिल्लक नफा पुढील वर्षासाठी वर्ग केला	रु.	२५,१८,९६२.००
एकूण	**रु.**	**५,२०,८६,३७३. ००**

२. सभा :

(अ) वार्षिक सर्वसाधारण सभा : संस्थेची ६२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक १६/०९/२०२३ रोजी घेण्यात आली व ही सभा तहकूब झाली. ही तहकूब झालेली सभा पुन्हा दिनांक २२/०९/२०२३ रोजी DAE कनव्हेंशन सेंटर येथे संपन्न झाली. सदर सर्वसाधारण सभेस ११,९३२ सभासदांनी उपस्थिती दर्शविली. प्रत्येक सभासदांस रु. ५० x ५ अशी एकूण रु. २५० ची कुपन वितरित करण्यात आली. म्हणजेच रु. ५० x११,९३२ x ५ = २९,८३,०००/- इतकी कुपन्स वितरीत करण्यात आली. प्रत्यक्षात कँटीन मार्फत रु. ५० x ५७,७६९ इतकी कुपन्स प्राप्त झाली व रु. २८,८८,४५० /- इतकी रक्कम अदा केली.

(ब) संचालक मंडळाच्या सभा : अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण १२ मासिक सभा व १५ विशेष सभा झाल्या. सर्व सभांना संचालकांची जास्तीत जास्त उपस्थिती होती.

३. लाभांश व वर्गणीवरील व्याज :

अ) भाग रक्कमेवरील लाभांश : अहवाल वर्षात संचालक मंडळ भाग रकमेवर सहकार खात्याने घालून दिलेल्या मर्यादेस अधीन राहून कमाल १५% लाभांश जाहीर करीत आहे. लाभांशाची एकूण रक्कम रु. ४,२५,९४,२५८/- सभासदांचे धारण केलेल्या भाग रक्कमेप्रमाणे वार्षिक सर्वसाधारण सभेच्या मंजुरीनंतर सभासदांना वितरित करण्यात येईल.

ब) सभासद वर्गणीवरील व्याज : अहवाल वर्षात सभासदांच्या सभासद वर्गणीस मासिक सरासरी शिल्लक रकमेवर दिनांक ३१/०३/२०२४ रोजी १०% प्रमाणे व्याजाची तरतूद करण्यात आली असून सर्वसाधारण सभेनंतर सभासदांना व्याजाची रक्कम वितरीत करण्यात येईल.

४. अंदाजपत्रक : सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास संचालक मंडळाने मान्यता देण्यासाठी शिफारस केली आहे. सदर अंदाजपत्रक अहवालामध्ये समावेश केले आहे. तथापि सदर अंदाजपत्रकास मंजुरी मिळावी.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरिता अंदाजपत्रक तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास गतवर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस मान्यता देण्यात आली होती. त्यामध्ये अपेक्षित उत्पन्न रु. ८१.७० कोटी दर्शविण्यात आले होते व अपेक्षित खर्च रु. ७७.४६ कोटी दर्शविण्यात आले होते, प्रत्यक्षात रु. ७५.१२ कोटी इतके उत्पन्न मिळाले. एकूण रु. ६१.९९ कोटी इतका खर्च झाला आहे. गतवर्षी अंदाजित नफा रु. १२.६० कोटी इतका दर्शविण्यात आला होता परंतु अहवाल साली स्थूल नफा रु. ५२.५४ लाख इतका जास्त झाल्यामुळे निव्वळ नफा रु. १३.१३ कोटी इतका प्राप्त झाला आहे.

५. क्रियाशील सभासद : दिनांक ३१ मार्च २०२३ अखेर एकूण १९,७१६ इतके सभासद होते. यामध्ये अहवाल वर्षात २४९ नवीन सभासद झाले. ९३९ सभासद, निवृत्ती, मृत्यू इत्यादी कारणाने कमी झाले असून दिनांक ३१ मार्च, २०२४ अखेर सभासद संख्या १९,०२६ इतकी आहे.

६. भाग भांडवल : अधिकृत भाग भांडवल रु. ५० कोटी आहे. ३१ मार्च २०२४ अखेर वसूल भाग भांडवल रु. २७,८१,९२,५००/- इतके झालेले आहे.

७. वैधानिक राखीव निधी : ३१ मार्च २०२३ अखेर वैधानिक राखीव निधी रु. २९,४१,६९,३६५/- इतका होता. त्यामध्ये अहवाल वर्षात गतवर्षीच्या नफा विभागणीतून रु. ४१,९५,३५०/- जमा झाले. रु. २४,९००/- प्रवेश शुल्क व रु. ६,५२,३१९/- न घेतलेल्या सन २०१९-२०२० चा लाभांश असे मिळून ३१ मार्च २०२४ अखेर वैधानिक राखीव निधी रु. २९,९०,४१,९३४/- इतका झाला आहे.

८. ठेवी : दरवर्षीप्रमाणे सभासदांकडून अहवाल वर्षातही ठेवी ठेवण्यास चांगला प्रतिसाद मिळाला आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे :-

१ एप्रिल, २०२३ रोजी प्रारंभिक शिल्लक	रु. ५२०,४५,३३,८३९.००
अहवाल वर्षात जमा झालेल्या ठेवी	रु. ३३१,३२,९५,१६४.००
अहवाल वर्षात परत केलेल्या ठेवी	रु. ३३०,००,८४,९५३.००
३१ मार्च २०२४ अखेरच्या शिल्लक ठेवी	**रु. ५२१,७७,४४,०५०.००**

९. कर्जे : दरवर्षीप्रमाणे सभासदांकडून अहवाल वर्षातही कर्ज उचल करण्यास चांगला प्रतिसाद मिळाला आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे :-

१ एप्रिल, २०२३ रोजी प्रारंभिक शिल्लक	रु. ७२५,२८,१९,३३०.००
अहवाल वर्षात कर्ज वाटप	रु. ५४९,२८,७३,६३६.००
अहवाल वर्षात वसूल झालेले कर्ज	रु. ४४५,७२,०५,०५२.००
३१ मार्च २०२४ अखेरचे शिल्लक कर्ज	**रु. ८२८,८४,८७,९१४.००**

१०. कर्ज थकबाकी :- दिनांक ३१ मार्च २०२४ अखेर सभासदांना वाटप करण्यात आलेल्या एकूण कर्जाची येणे बाकी रु. ८२८,८४,८७,९१४/- इतकी असून संबंधीत कर्जापैकी एकूण थकबाकी रु. १,३१,४७,५८१/- इतकी आहे. थकबाकीची एकूण येणे कर्जाशी प्रमाण ०.१५ % इतके आहे. सदरची थकबाकी दिसत असली तरी कर्जाची वसुली चालू आहे.

११. संड्री खाते : दिनांक ३१ मार्च , २०२३ अखेर संड्री खात्यात रु. २,९८,६२,०१३/- इतकी रक्कम शिल्लक होती. अहवाल साली संड्री खात्यामध्ये रु. ३,६९,७३९/- इतकी रक्कम जमा झाली. दिनांक ३१ मार्च २०२४ अखेर संड्री खात्यात रु.३,०२,३१,७५२/- इतकी रक्कम शिल्लक आहे.

१२. मृत्यू सहाय्य निधी : अहवाल वर्षात या निधीमधून ४३ मृत सभासंदांच्या वारसांना (सन २०२३-२४ मधील ३४ सभासद आणि मागील वर्षांमधील ९ सभासद) रु. १५०००/- x ४२ , रु.१०००० x १ एकूण रक्कम रु.६,४०,०००/- इतके अर्थसहाय्य देण्यात आले.

१३. क्लिन कॅश कर्ज सुविधा : मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून आपल्या पतसंस्थेस रु. ३६८.१४ कोटी क्लिन कॅशसुविधा मंजूर झाली होती.
सभासदांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने मंजूर केलेल्या क्लिन कॅशकर्ज रकमेपैकी रु. २२५.६८ कोटींची सन २०२३-२४ मध्ये उचल करण्यात आली आहे. मुंबई बँकेने या दिलेल्या सुविधेबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

१४. सभासद आपुलकी निधी योजना : संस्थेकडे ३१ मार्च, २०२४ पर्यंत अहवाल वर्षात सदरच्या योजनेत सामील असलेले एकूण ३४ सभासद मृत झाल्याची नोंद झाली, यापैकी अहवाल सालात २५ मयत सभासद अधिक मागील वर्षातील देय असलेले १३ मयत सभासद अशा एकूण ३८ मयत सभासदांच्या कायदेशीर वारसास सभासद आपुलकी निधी अंतर्गत प्राप्त झालेल्या वर्गणीतून प्रत्येकी रु. १ लाखाची मदत देण्यात आली.
या योजनेचा तपशील पुढील प्रमाणे :-

१ एप्रिल, २०२३ रोजीची शिल्लक निधी	रु. ३,९९,९३८.००
अहवाल साली वर्गणीद्वारे जमा झालेला निधी	रु. ४५,२६,८००.००
गतवर्षीचे सदर योजनेतून दिवंगत सभासदांच्या वारसास आर्थिक मदत	रु. १ ३,००,०००.००
अहवाल सालातील दिवंगत सभासदांच्या वारसास आर्थिक मदत	रु. २५,००,०००.००
३१ मार्च २०२४ अखेरचे शिल्लक असलेली रक्कम	**रु. ११,२६,७३८.००**

खालील सभासदांच्या वारसांस रु. एक लाखाची मदत आपुलकी निधी योजने अंतर्गत देण्यात आली.

अ. क्र.	सभासद क्रमांक	संगणक क्रमांक	दिवंगत सभासदाचे नाव	मृत्यू दिनांक
1	28981	CA//1017	शिवदास एम व्ही	07.01.2023
2	45474	IR//29165	कंथाराजू आर	19.05.2022
3	26424	TP/921/0292	अविनाश परशुराम राऊळ	05.12.2022
4	31212	NG/423/0074	बोबडे सुधीर गोविंद	27.04.2023
5	40746	NG/312/0038	तिवारी रजनीश आर	12.04.2023
6	44017	SC/214/0003	शेखर एन लोणारे	05.01.2022
7	29884	NG/109/0056	चंद्रशेखर व्ही तापकीर	21.05.2023
8	27687	NP/913/7306	सबिथा प्रेमचंद्रन	12.06.2023
9	28201	IR//17812	शरणप्पा गुरीकर	01.04.2023
10	39575	TA/181/1410	राहुल सखाराम माळी	27.04.2018
11	19199	NG/109/0009	लक्ष्मण बी शिखरे	16.07.2023
12	46921	NH//6638	कुंजूमोन के	15.01.2021
13	27479	TP/924/0493	प्रेमदास रामकृष्ण केणी	17.07.2023
14	40063	NG/405/1718	दिनेश दिलीप गायकवाड	03.09.2023
15	25013	G/402/0279	संजय जे बारापात्रे	19.08.2023
16	22143	DP//00613	शिंदे पी एम	03.09.2023
17	24464	NA/141/7096	डी के गुप्ता	06.01.2023
18	39431	G/527/0043	मंजुलता साहू	15.08.2023
19	37134	NA/141/2094	वीरेंद्र के शर्मा	07.07.2023
20	25700	BR//20017	सुरेश जे सुपत	08.03.2023
21	26957	BR//20016	माधवसिंग सी परमार	29.11.2022
22	47375	CA//1476	प्रदीप कुमार बाजपेयी	24.04.2021
23	32465	NG/208/0100	नितीन एम मिस्त्री	06.10.2023
24	34858	G/508/0539	मनीष शर्मा	28.08.2023
25	24442	NP/910/6936	जी एम सुभेदार	20.09.2023
26	33662	RA/171/2462	सीता राम जांगीड	20.09.2023
27	31194	IR//17742	गोकुळराजन के	07.09.2023
28	22992	G/546/0002	बंडोपाध्याय टी	14.11.2023
29	30753	NG/203/0796	जनार्दन जानू झोरे	12.12.2023
30	19705	NG/406/1159	अनंता राम यादव	15.12.2023
31	28477	NG/103/0828	श्रीधर पांडुरंग मोरे	07.01.2024
32	31686	NH//5848	पी एल एन मल्लिका	14.11.2023
33	27599	TA/111/3925	एम एल वारखंडे	04.05.2023
34	36272	G/351/0191	किरण ठकाजी पंडित	16.01.2024
35	45390	TA/112/2196	प्रमोद बबन मते	23.10.2023
36	25251	NG/108/0167	ठुकराल शंकर वासुदेव	28.02.2023
37	46257	NG/306/0209	ललित दयावंत कांथे	13.03.2023
38	21504	NG/103/0774	पावल रतिपाल बारूराम	19.10.2022

१५. सभासद कल्याण निधी : सदर निधी अंतर्गत अहवाल वर्षात खालील उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आले.

१) सन्माननीय सेवानिवृत्त सभासदांचा सत्कार : आमच्या संचालक मंडळाने दिलेल्या वचनास अधीन राहून ज्या सभासदांनी संस्थेप्रती योगदान दिले आहे. अशा सभासदांच्या सेवानिवृत्तीच्या दिवशी गौरव सभासदांचा कार्यक्रमांतर्गत पूर्ण सभासदत्वाच्या संस्थेप्रती दिलेल्या योगदानानुसार प्रति वर्ष रुपये ५००/- प्रमाणे धनराशी, शाल, पुष्पगुच्छ व मानपत्र देऊन सन्मानित करण्यात येत आहे. अहवाल साली एकूण ५३३ सभासदांना सन्मानित करण्यात आले.

२) सन्माननीय सभासदांच्या पाल्यांचा गुणगौरव (ज्ञानरत्न) : शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये माननीय सभासदांच्या इ. १० वी , इ. १२ वी तसेच १० + २ (आय. टी. आय. + तत्सम) प्रमाणपत्र आणि १० + ३ (पदविका व तत्सम) अभ्यासक्रम परीक्षेमध्ये ६० % पेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या एकूण ६७२ पाल्यांचा 'ज्ञानरत्न' कार्यक्रमांतर्गत प्रमाणपत्र व रेखांकित धनादेश (प्रत्येकी रु.१५०१/-) देऊन दिनांक २८/०१/२०२४ रोजी DAE Convention Centre,अणुशक्तीनगर येते गुणगौरव करण्यात आला.

३) २६ जानेवारी, २०२४, झेंडा वंदन : संस्थेच्या अणुशक्तीनगर मंदाकिनी कार्यालयाचे प्रागंणात २६ जानेवारी, २०२४ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त झेंडा वंदन करण्यात आले. सदर कार्यक्रमास संस्थेचे सन्माननीय सभासद, संचालक व कर्मचारी उपस्थित होते. प्रसंगी संचालक मंडळाच्या वतीने नविन कर्ज धोरण दि. २५ जानेवारी, २०२४ पासून अंमलात आणल्याचे सभासदांच्या निदर्शनास आणून दिले व त्याचा लाभ सर्वांनी घ्यावा अशी शिफारस करण्यात आली.

१६. विक्रम कर्ज - कर्ज संरक्षण योजना : दि. ३० एप्रिल, २०२३ अखेर पर्यंत सदरची योजना ही विशेष "कर्ज - कर्ज संरक्षण योजना" या नावाने संबोधित होती. 'विक्रम कर्ज संरक्षण योजना' दि. ०१ मे, २०२३ पासून नविन नियम व अटी अंतर्भुत करून लागू करण्यात आली.

दि. २३ एप्रिल, २०२३ रोजी संस्थेचे सभासद पोसम भास्कर देवदास स. क्र. २५१६२ यांचे निधन झाले. निधन समयी त्यांचे विशेष कर्ज रु.१५,१९,१०९/- इतके शिल्लक होते. तत्कालीन योजनेच्या अटी व नियमास अधीन राहून केवळ रु.९,२४,२०७/- इतके विशेष कर्ज निरस्त केले.

दिनांक ०१/०५/२०२३ ते दिनांक ३१/०३/२०२४ पर्यंत विक्रम कर्ज संरक्षण योजनेच्या अटी व शर्तीस अधीन राहून विक्रम कर्ज संरक्षण निधीतून १७ सभासद व मागील विशेष कर्ज – कर्ज संरक्षण योजनेतील एक सभासद अशा एकूण १८ पात्र दिवंगत सभासदांची एकूण २५ कर्ज प्रकरणे या योजनेअंतर्गत त्यांच्या दिवंगत झाल्याच्या दिवशी ऊर्वरित असलेले कर्ज रु. १,५९,१६,६७३/- इतके कर्ज संचालक मंडळाने निर्णय घेऊन विक्रमकर्ज - कर्ज संरक्षण योजनेमधून माफ केले.

या निर्णयामुळे दिवंगत सभासदांच्या कुटूंबियांस व या कर्जास जामीन असलेल्या जामीनदार सभासदांना दिलासा मिळाला आहे.

सदर पात्र दिवंगत सभासदांचा तपशील पुढीलप्रमाणे :-

अ. क्र.	सभासद क्रमांक	संगणक क्रमांक	दिवंगत सभासदांचे नावं	कर्जाचा प्रकार	कर्ज निरस्त रक्कम	मृत्यू दिनांक
1	28162	G/109/0024	पोसम भास्कर देवदास	विशेष कर्ज	9,24,207/-	23.04.2023
2	43664	NG/107/1956	चव्हाण अजय राम	विशेष कर्ज	10,44,396/-	14.12.2022
3	21504	NG/103/0774	पावल रतिपाल बारूराम	विशेष कर्ज	7,15,600/-	20.10.2022
4	25251	NG/108/0167	ठुकराल शंकर वासुदेव	विशेष कर्ज	89,853/-	28.02.2023
5	40142	AS//6988	सदानंद तालुकदार	विशेष कर्ज	9,47,008/-	23.02.2023
6	25013	G/402/0279	संजय जे बारापात्रे	साधारण कर्ज	4,25,124/-	19.08.2023
7	25013	G/402/0279	संजय जे बारापात्रे	विशेष कर्ज	4,81,465/-	19.08.2023
8	35859	GP/122/2121	ओम प्रकाश	साधारण कर्ज	70,573/-	31.08.2023
9	35859	GP/122/2121	ओम प्रकाश	विशेष कर्ज	8,27,898/-	31.08.2023
10	40746	NG/312/0038	तिवारी रजनीश आर.	विशेष कर्ज	8,13,827/-	12.04.2023
11	25663	DP//00595	मिनाक्षी दिनेश पाटील	साधारण कर्ज	3,91,295/-	18.11.2023
12	25663	DP//00595	मिनाक्षी दिनेश पाटील	विशेष कर्ज	9,02,580/-	18.11.2023
13	27479	TP/924/0493	प्रेमदास रामकृष्ण केणी	विशेष कर्ज	34,272/-	16.07.2023
14	28477	NG/103/0828	श्रीधर पी मोरे	साधारण कर्ज	2,84,065/-	07.01.2024
15	28477	NG/103/0828	श्रीधर पी मोरे.	विशेष कर्ज	8,62,125/-	07.01.2024
16	32465	NG/208/0100	नितीन एम मिस्त्री	साधारण कर्ज	4,41,162/-	06.10.2023
17	32465	NG/208/0100	नितीन एम मिस्त्री	विशेष कर्ज	17,28,660/-	06.10.2023
18	36105	OC//6866	अर्जुन मुर्मू	विशेष कर्ज	4,67,893/-	05.08.2023
19	40063	NG/405/1718	दिनेश दिलीप गायकवाड	साधारण कर्ज	4,65,192/-	03.09.2023
20	40063	NG/405/1718	दिनेश दिलीप गायकवाड	विशेष कर्ज	17,68,928/-	03.09.2023
21	45450	OC//5743	लखिंदर मुर्मू	विशेष कर्ज	5,42,092/-	25.09.2023
22	47234	NG/107/2014	मोराळे संतोष बाबासाहेब	साधारण कर्ज	2,25,931/-	07.06.2023
23	47234	NG/107/2014	मोराळे संतोष बाबासाहेब	विशेष कर्ज	6,83,334/-	07.06.2023
24	25700	BR//20017	सुरेश जे सुपत	विशेष कर्ज	1,95,502/-	08.03.2023
25	26483	NG/103/0921	प्रशांत वाय पाटील	विशेष कर्ज	5,83,691/-	07.02.2023
				एकूण निरस्त रक्कम	**1,59,16,673/-**	

१७. सभासद भविष्य सहाय्य्य निधी : दिनांक ३१ मार्च २०२३ अखेर २,२६२ इतके सभासद सदरच्या योजनेत सामील होते. अहवाल साली २२९ सभासद सेवानिवृत्त, राजीनामा, मृत्यू इत्यादी कारणाने कमी झाले व ३१ मार्च २०२४ अखेर २०३४ इतके सभासद या योजनेत सामील आहेत.

१८. के. वाय. सी. पूर्तता करून घेणे : ९७ व्या घटनादुरुस्तीप्रमाणे KYCनॉर्म्सची पूर्तता करून घेणे संस्थेस बंधनकारक आहे. ज्यांनी KYC नॉर्म्स अद्यापपर्यंत पूर्ण केलेले नाहीत अशा सभासदांच्या वेतनातून संस्थेस प्राप्त

होणाऱ्या दरमहाच्या हप्त्या व्यतिरिक्त इतर व्यवहार स्थगित ठेवण्यात आले आहेत व अशा सभासदांनी KYC नॉर्म्सची पूर्तता केल्यानंतरच त्यांचे संस्थेचे व्यवहार पूर्ववत करण्यात येतील.

१९. वैधानिक लेखापरिक्षण : सन २०२३-२०२४ सालचे वैधानिक लेखापरिक्षण सहकार खात्याच्या पॅनल वरील मे एस. ए. ए. जे. अँड असोसिएट्स, सनदी लेखापाल यांनी पूर्ण केलेले असून 'अ ' वर्ग प्रदान करण्यात आलेला आहेत. त्यांचे लेखापरीक्षित अहवाल या सोबत आपल्या समंतीसाठी जोडले आहेत.

२०. लेखापरिक्षण :२०२३-२०२४ या वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण मेसर्स एस. ए. ए. जे. अँड असोसिएट्स., अंतर्गत लेखापरीक्षण सीए धीरज वाघमारे तसेच कर लेखापरिक्षण मेसर्स सीए बी. आर. सावंत अँड कंपनी यांनी लेखापरीक्षण वेळेत पूर्ण केले आणि त्यांच्या लेखापरिक्षण कालावधी मध्ये त्यांनी महत्वाच्या सूचना आणि मार्गदर्शन दिले.

२१. संचालक मंडळ : पतसंस्थेच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी पतसंस्थेच्या संचालक मंडळाने यशस्वीपणे प्रयत्न केले आहेत.
अहवाल सालात पतसंस्थेच्या संचालक मंडळाच्या एकूण १२ मासिक सभा झाल्या व १५ विशेष सभा झाल्या त्यात मा. संचालकांनी उपस्थित राहून पतसंस्थेच्या कामकाजामध्ये दक्षतापूर्वक सहभाग घेऊन सहकार्य केले.

२२. कर्मचारी वृंद : पतसंस्थेचे कामकाज प्रामाणिकपणे व कार्यक्षमतेने एकूण २० कर्मचाऱ्यांनी पार पडले.

२३. सहकार प्रशिक्षण : सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात संचालक सदस्य व कर्मचारी वर्गाने प्रशिक्षणात भाग घेतला. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे:

वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ कॉपरेटिव्ह मॅनेजमेंट, पुणे येथे दिनांक १६ मार्च ते १७ मार्च २०२४ रोजी सहकार प्रशिक्षण आयोजित केले होते. सदर प्रशिक्षण वर्गात सहकारी पतसंस्थेसमोरील आव्हाने, KYC प्रणाली, इंटरप्रेटेशन ऑफ फिनंसिअल स्टेटमेंट, आयकर तरतुदी आणि क्रेडिट सोसायटीसाठी TDS लागू असणे, एकमेकांशी परस्पर संबंध आणि संप्रेषण, व्यवसाय विकासात संचालक मंडळाची भूमिका तसेच संगणकीकरण आणि सायबर सुरक्षा इत्यादी विषयावर प्रशिक्षण झाले. आपल्या संस्थेच्या एकूण १५ संचालक सदस्यांनी तसेच २० कर्मचारी वर्गाने या प्रशिक्षणास उपस्थित राहून प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

२४. संस्थेपुढील आव्हाने:

१) संस्थेला लागणारी रोख रक्कम बँकेतून काढण्यासाठी लागत असलेल्या उदगम कराबाबत (TDS): नवीन नियमानुसार बँकेतून पूर्ण आर्थिक वर्षात ठराविक रकमेपेक्षा जास्त रोख रक्कम काढल्यास बँक दोन टक्के उदगम कर कपात करते. उदा. एखाद्या सभासदाने संस्थेतून रुपये दहा हजार रोख रक्कम संस्थेच्या बचत खात्यातून काढल्यास संस्थेस दोनशे रुपये बँकेस द्यावे लागतात . त्यामुळे सभासदांना विनंती करण्यात येते कि त्यांनी संस्थेच्या बचत खात्यातून कमीत कमी रोख रक्कम काढावी. सभासदांनी बचत खात्यातून रक्कम काढण्यासाठी रोखपालकडे विथड्रॉवल स्लिप जमा केल्यानंतर तात्काळ CMP पोर्टलद्वारे सभासदांच्या बँकेच्या बचत खात्यात रक्कम जमा करण्याची व्यवस्था संस्थेद्वारे करण्यात आली आहे.

2) लेखापरीक्षणातील दोष दुरुस्ती शेरे: संस्थेचे जुने रेकॉर्ड उपलब्ध नसल्यामुळे संबंधित वैधानिक लेखापरीक्षकांकडून दोषदुरुस्ती अहवालामध्ये देण्यात येणारे शेरे काढून टाकण्यासाठी कार्यवाही करण्यात अडचणी येत आहेत.

२५. आयकर केसेस -

१) आयकर निर्धारण वर्ष २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५: CIT व ITAT येथे संस्थेच्या बाजूने निर्णय देण्यात आला आहे. परंतु आयकर विभाग या निर्णयाच्या विरुद्ध मा. उच्च न्यायालयात गेल्यामुळे संस्थेने या कामकाजाबाबत दिलीप बोडके- ऍडव्होकेट, उच्च न्यायालय यांची नेमणूक केली आहे. सध्या आयकर निर्धारण वर्ष २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५ च्या केसेस उच्च न्यायालयात प्रलंबित आहेत.

2) आयकर निर्धारण वर्ष २०१६-१७, २०१७ -१८, २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१: सदर केस CITमध्ये प्रलंबित आहेत.

२६. संगणकीकरण : या आर्थिक वर्षामध्ये पतसंस्थेने सभासदांना त्यांची व्यक्तिगत माहिती तात्काळ मिळण्यासाठी संस्थेच्या Website वरून माहिती उपलब्ध करून दिली.

ज्या सभासदांना website वापरण्याची संधी (Access) मिळत नाही अशा सभासदांना विनंती करण्यात येते कि, त्यांनी आपली संस्थेकडे KYCची प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, त्यानंतरच त्यांना Website Access होईल व आपला व्यक्तिगत डाटा मिळवता येईल.

शेवटी सर्व सभासदांना आश्वस्त करावेसे वाटते कि, सभासदांना सेवा देणे व आर्थिक विकास करण्यासाठी पतसंस्था कटीबद्ध आहे.

२७. SMS (Message) संदेश: लघु संदेश (SMS) या संप्रेषणाचा लोकप्रिय मार्ग अवलंबून सभासदांना त्यांनी संस्थेप्रती केलेल्या आर्थिक व्यवहाराची नोंद मिळण्याची सुविधा लघु संदेशाद्वारे संस्थेने देण्यास सुरुवात केली असून याचा लाभ सभासदांना मिळत आहे.

सभासदांना विनंती करण्यात येते की, ज्या सभासदांनी अद्याप आपला मोबाईल क्रमांक/ई-मेल संस्थेस सादर केला नाही अशा सभासदांनी मोबाईल क्रमांक संस्थेत सादर करून एसएमएस सेवेचा लाभ घ्यावा अशी इच्छा संचालक मंडळ व्यक्त करत आहे.

२८. संकेतस्थळ: बी.ए.आर.सी. व डी.ए.ई. च्या सर्व युनिटच्या सभासदांना पतसंस्थेचे ताळेबंद, नफा - तोटा पत्रक, सर्वसाधारण सभांचे इतिवृत्त, परिपत्रके इ. बाबतची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे. https://www.barcsociety.com या संकेत स्थळावरील सेवेचा लाभ सर्वांनी घ्यावा.

२९. TDS कपात : संस्थेने सभासदांना आर्थिक वर्ष २०२३-२४ यामध्ये त्यांच्या ठेवीवरील दिलेले व्याजाच्या स्वरूपातील मिळकतीवर TDS ची रक्कम / जमा करून / कपात करून प्राप्तकर्त्याच्या वतीने आयकर विभागाकडे भरलेला आहे.

सभासदांनी संस्थेस देय असलेल्या TDS रकमेची वसुली ही मागील सर्वसाधारण सभेच्या निर्देशानुसार अहवालसाली दि. ३१ मार्च, २०२४ रोजी टॅक्स डिडक्शन ऍट सोर्स चा अवलंब करून सभासदांच्या सभासद वर्गणीच्या देय व्याज रकमेतून TDS ची देय रक्कम वसूल करून घेण्यात आली आहे.

सभासदांना विनंती करण्यात येते की, अजूनही ज्यांच्या TDS रकमेचे देय आहे अशा सभासदांनी संस्थेत येऊन जमा करावी .

३०. वेध भविष्याचा : संस्थेच्या सन्माननीय भागधारक सभासदांच्या आर्थिक उन्नतीसाठी पतसंस्था नेहमीच तत्पर राहील. यासाठी सहकार विभागाने घालून दिलेल्या कर्ज धोरणाचा स्वीकार करून सभासदांना जास्तीत जास्त कर्जपुरवठा करण्यात येईल. आधुनिक तंत्रज्ञानामध्ये सतत बदल होत आहेत. या बदलांचा स्वीकार करून सभासदांना जलद सेवा देण्याचा आमचा मानस आहे.

TDS संकल्पनेमुळे सभासद वर्गणीची आंशिक रक्कम काढण्यासाठी सभासदांची वारंवार मागणी होत आहे. आम्ही मा.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, पुणे यांचेकडून परवानगी मिळविण्यासाठी प्रयत्न करणार आहोत.

संस्थेचे सन २०२३-२०२४अखेर खेळते भांडवल (वार्षिक उलाढाल) रु. ९२६ कोटी इतके आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे चालू आर्थिक वर्षात रु.१००० कोटी पर्यंत खेळते भांडवल पूर्ण करून आपली संस्था ही सहकार चळवळीतील एक अग्रगण्य संस्था असणार आहे.

३१. सर्व डीएई युनिट सभासदां पर्यंत पोहचण्यासाठी पुढाकार :

